परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in
9881265102
संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 258 | शनिवार दि. 18 ऑक्टोबर 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

दिपावली विशेषांक 2025 लवकरच...
जाहिराती करिता त्वरित संपर्क करा

## ना. पंकजाताई मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत साजरी केली दिवाळी

➲ मुलांसोबत पणती रंगविण्यात अन् आकाश कंदील बनविण्यात घेतला उत्साहाने घेतला सहभाग



मुंबई, दि. 18 ---- दिवाळीचा सण म्हणजे फक्त दिव्यांचा, फटाक्यांचा किंवा सजावटीचा उत्सव नाही तर तो माणुसकीचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा उत्सव आहे, हा विचार करून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी आज एका आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून ना. पंकजाताई भावूक झाल्या.

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि द चिल्ड्रन्स एड सोसायटी फॉर अंडरप्रिव्हिलेज्ड किड्स ऑर्फनेजच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आधुनिक कला दालन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली. या वेळी आकाश कंदील बनविण्याची कार्यशाळेचे आणि प्रसिद्ध कलाकार ए. ए. अल्मेलकर यांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी उपस्थित होत्या.

यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या, ही अनाथ मुलं कोणत्या जातीची,धर्माची आहेत हे महत्त्वाच नाही, तर ती माणसाची आहेत आणि त्यांच्या डोळ्यांतील आनंद हा समाजासाठी प्रेरणादायी आहे. असा समाज घडला पाहिजे, जिथे प्रत्येक माणूस स्वतःची ओळख स्वतः निर्माण करेल.

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी पर्यावरण विभागाने समाज माध्यमांद्वारे जनजागृती केली आहे, असे सांगून सर्व नागरिकांनी प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपण ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळून, निसर्गाशी सुसंगत अशी पर्यावरण

पान 3 वर

## फसवे पॅकेज, शेतकऱ्यांची काळी दिवाळी करणाऱ्या सरकारचे धिक्कार,

» काँग्रेस करणार राज्यभर पिठलं भाकर आंदोलन



मुंबई : अतिवृष्टी आणि पुरामुळं राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. उभी पिकं आडवी झाली आहेत, तर अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. त्यामुळं शेतकरी मोठ्या संकटात आहे. मात्र, शेतकऱ्यांना सरकारनं भरीव पॅकेज तसेच कर्जमाफी अद्याप दिलेली नाही. याच मुद्यावरुन काँग्रेस आक्रमक झाली आहे. भाजपा महायुती सरकारचा धिक्कार करण्यासाठी काँग्रेस पक्ष सोमवार दिनांक 20 ऑक्टोबर रोजी राज्यभर शेतकऱ्यांसोबत पिठलं, भाकरी व ठेचा खाऊन आंदोलन करणार आहेराज्यातील बळीराजावर यावर्षी मोठे संकट ओढवले आहे. शेतकरी उद्ध्वस्थ झाला असताना त्याला भरीव पॅकेज व कर्जमाफी देण्याची आवश्यकता होती. परंतु सरकारने जाहीर केलेले पॅकेज अत्यंत तुटपुंजे आहे. जे जाहीर केले तेही शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाही. जगाचा पोशिंदा बळीराजावर काळी दिवाळी करण्याची वेळ आहे. या परिस्थितीला शेतकरी विरोधी महायुती सरकारच जबाबदार आहे. भाजपा महायुती सरकारचा धिक्कार करण्यासाठी काँग्रेस पक्ष सोमवार दिनांक 20 ऑक्टोबर रोजी राज्यभर

पान 3 वर

## आज ठळक

### शिष्यवृत्ती परीक्षेबाबत मोठा निर्णय! शिक्षण विभागाकडून वय आणि वर्गात बदल, यंदा होणार चार वर्गांसाठी परीक्षा



राज्यातील शिष्यवृत्ती परीक्षा देणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांसाठी महत्वाची बातमी आहे. शिक्षण विभागाने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार आता पुढील वर्षापासून शिष्यवृत्ती परीक्षा ही पाचवी आणि आठवी ऐवजी चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांना लागू असेल. यामुळे यंदा यंदाच्या वर्षी चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी या चारही वर्गांसाठी ही परीक्षा आयोजित करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. तर 2026 मध्ये पूर्वीप्रमाणे चौथी आणि सातवी या वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजित केले जाणार आहे.राज्यातील गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, स्पर्धात्मकतेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण विभागाकडून पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती घेतली जाते. पूर्वी ही परीक्षा चौथी आणि सातवी या इयत्तांसाठी घेतली जात होती. मात्र, शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदी प्रमाणे यात बदल करण्यात आला. 2016-17 पासून ती पाचवी आणि आठवी या वर्गांसाठी लागू करण्यात आली.मात्र वर्गात बदल केल्यानंतर गेल्या नऊ वर्षात सतत या परीक्षेत परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर, शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी पूर्वीप्रमाणेच चौथी आणि सातवी या वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. पण या निर्णयाचा अद्याप शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही. यामुळे शिक्षक, पालकांमध्ये सध्या संभ्रम निर्माण झाला होता.पण आता शिक्षण विभागाने शासन निर्णय जारी केला असून शिष्यवृत्ती परीक्षा पाचवी आणि आठवी ऐवजी आता चौथी आणि सातवी या वर्गांसाठी लागू करण्यात आली आहे. या बदलाची अंमलबजावणी

पान 3 वर

## सूर्यकांत मुंडे यांना पितृशोक



परळी (प्रतिनिधी) : परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक सूर्यकांत रामकृष्ण मुंडे यांचे वडील रामकृष्ण यादवराव मुंडे यांचे दुःखद निधन दिनांक 17 ऑक्टोबर 2025 रोजी रात्री 10 वाजता झाले. त्यांच्या निधनाने परळी तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

स्व. रामकृष्ण मुंडे हे परळी परिसरातील आदरणीय व सर्वमान्य व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनाने समाजातील एक प्रेमळ, सुसंस्कृत व कर्तृत्ववान व्यक्ती हरपली आहे.

त्यांचा अंत्यविधी दिनांक 18 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 10 वाजता लिंबुटा स्मशानभूमी येथे पार पडला.

शोकाकुल कुटुंबीयांमध्ये मुलगा सूर्यकांत मुंडे,मंचक मुंडे,बहीण यांच्यासह नातवंडे, पत्रुंडे, चितरुंडे असा भरगच्च परिवार आहे. परळी परिसरातील नेते , सामाजिक कार्यकर्ते राजकीय सहकाऱ्यांनी आणि नागरिकांनी मुंडे कुटुंबीयांप्रती गाढ शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत. मुंडे परिवाराच्या दुःखात दैनिक संघर्ष नेता सहभागी आहे

## पत्रकार मारहाण प्रकरणी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील दोषी




अलिबाग- पत्रकार हर्षद कशाळकर यांना मारहाण केल्या प्रकरणात शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांना अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी दोषी ठरवले आहे. एक वर्ष चांगल्या वर्तणुकीचा हमीपत्र आणि पाच हजारांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

2019 च्या लोकसभा निवडणूक मतमोजणी दरम्यान मतमोजणी केंद्रात घुसून जयंत पाटील यांनी तुम्ही पत्रकार काही बातम्या छापतात म्हणत मारहाण केली होती. या प्रकरणी 24 मे 2019 रोजी अलिबाग पोलीस

पान 3 वर

## आधी जालना अन् आता बीड; पंकजा मुंडेंनी दुसऱ्यांदा टाळलं भुजबळ, ओबीसींचं व्यासपीठ!



मराठा आरक्षण लागू करण्यासाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आझाद मैदानावरील आंदोलनानंतर महायुती सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला. गॅझेटमधील नोंदीनुसार कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप आणि ओबीसींच्या सवलती या माध्यमातून दिल्या जाणार आहेत. याच निर्णयाविरोधात काल बीडमध्ये ओबीसी नेते मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली महाएल्गार सभा पार पडली. मंत्री पंकजा मुंडे (Pankaja Munde) या देखील सभेला उपस्थित राहणार अशा चर्चा होत्या. पण त्या सभेला आल्याच नाही. गेल्या वर्षी जालना येथील ओबीसींच्या एल्गार सभेलाही पंकजा मुंडे गैरहजर राहिल्या होत्या. आधी जालना अन् आता बीडमध्येही पंकजा मुंडे यांनी दुसऱ्यांदा भुजबळ आणि ओबीसींचं व्यासपीठ टाळल्याची चर्चा सुरु झाली आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाचा विजय म्हणून हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या निर्णयाकडे बघितले जाते. परंतु याच

पान 3 वर

## आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते आज बोधेगाव येथे विविध विकास कामांचा लोकार्पण व वचनपुर्ती सोहळा

» कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-माऊली (तात्या) गडदे





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- जलजीवन मिशन योजना, जिल्हा परिषद शाळा इमारत व श्री हनुमान मंदिर सभागृह यासह विविध विकास कामांचा लोकार्पन व वचनपुर्ती सोहळा राज्याचे माजी कृषिमंत्री मा.आ.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते होणार असुन यावेळी पंचक्रोशितील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक माऊली (तात्या) गडदे यांनी केले आहे.

तालुक्यातील बोधेगांव येथे रविवार दि.19 ऑक्टोबर 2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजता बोधेश्वर मंदिर येथे जलजीवन मिशन योजना, जिल्हा परिषद शाळेची 2 मजली इमारत ज्यात 7 रुम, बीड जिल्ह्यात टॉपवर असणारी डिजीटल अशी इमारत व श्री हनुमान मंदिर सभागृह यासह विविध विकास कामांचा लोकार्पन व वचनपुर्ती सोहळा मा.आ.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते होणार आहे. माऊली

पान 3 वर



## शंकर नगर, अंबाजोगाई येथे श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात नुतन सभा मंडपाचे अक्षय मुंदडा यांच्या हस्ते उद्घाटन



प्रकाश मुंडे/ केज प्रतिनिधी अंबाजोगाई येथील शंकर नगर भागातील श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरात आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या नुतन सभा मंडपाचे उद्घाटन मा. अक्षय भैय्या मुंदडा (भैय्यासाहेब) यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच नारळ फोडून करण्यात आले. मंदिर परिसराच्या विकासाच्या दृष्टीने हा सभा मंडप भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या उद्घाटन समारंभाला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर अण्णा उबाळे, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष गोकुळ नाना कदम, मोरेवाडी ग्रामपंचायतचे सरपंच श्री औदुंबर मोरे, श्री स्वामी समर्थ मंदिर ट्रस्टचे नाना महाराज डांगे, श्री आनंद काका आरसुडे, श्री. अमोल भैय्या पवार, श्री मंदार काटे, श्री गौरव लमतुरे, श्री डांगे यांच्यासह परिसरातील अनेक भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या वेळी बोलताना मान्यवरांनी आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या या सभा मंडपाबद्दल समाधान व्यक्त केले आणि मंदिर ट्रस्टच्या कार्याचे कौतुक केले. या नुतन सभा मंडपामुळे मंदिर परिसरात धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करणे अधिक सोयीचे होणार आहे.

# परळी तालुक्यात अतिवृष्टी व पूरामुळे बाधित शेतकऱ्यांना दिवाळीच्या तोंडावर अनुदान वितरणासाठी

## महसूल प्रशासनाचे रात्रदिवस परिश्रम



परळी तालुक्यात माहे ऑगस्ट व सप्टेंबर 2025 या दोन महिन्यात मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टी पर्जन्य व पूर यामुळे तालुक्यातील सिरसाळा, पिंपळगाव गाढे,मोहा ,नागापूर , परळी व धर्मापुरी या सर्व सहा महसुल मंडळामध्ये मोठ्या प्रमाणात पीक नुकसान झाले . तसेच मोठया प्रमाणातील पूर व ढगफुटी पाऊस तसेच गोदावरीस आलेला महापुर यामुळे शेत जमिनीचे खरडून व जमिनीवर गाळ साठुन देखील मोठया प्रमाणात नुकसान झाले .

परळी तालुका प्रशासनाने ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या पीक नुकसानीचा अहवाल शासनास सादर केलेला होता . त्यानुसार परळी तालुक्यास सप्टेंबर महिन्यात बाधित शेतकऱ्यांचे पीक नुकसान अनुदानकरिता 30 कोटी 16 लक्ष रुपये इतके अनुदान शासनाकडून प्राप्त झाले तर दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी सप्टेंबर महिन्यातील पीक नुकसानीचे 18 कोटी 17 लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले आहे. सदरील पीक नुकसान अनुदान हे दोन्ही टप्प्यात मिळून दोन हेक्टर पीक नुकसान क्षेत्राच्या मर्यादित प्राप्त झालेले असून एकूण 48 कोटी 34 लक्ष रुपये इतके अनुदान परळी तालुक्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेले आहे.

जिरायत पिकासाठी 8500 रुपये प्रति हेक्टरी, बागायत पिकासाठी 17500 रुपये प्रति हेक्टर व फळबागेसाठी 22500 रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे सध्याचे अनुदान प्राप्त झालेले आहे .तसेच माहे ऑगस्ट व सप्टेंबर या दोन टप्प्यात एकूण दोन हेक्टर च्या मर्यादेत सद्यस्थितीती। अनुदान प्राप्त झालेले आहे. दोन ते तीन हेक्टरच्या मर्यादेतील क्षेत्राच्या पीक नुकसानीचे अनुदान अद्याप शासनाकडून आलेले नसून त्या अनुषंगाने बहुभुधारक शेतकरी यांचेसाठी स्वतंत्र अनुदानाची मागणी केलेली आहे.

ऑगस्टमधील 30 कोटी 16 लाख अनुदानापैकी 25 कोटी 11 लक्ष रुपये अनुदान रकमेच्या 51 हजार 856 शेतकऱ्यांच्या याद्या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी 16 कोटी 53 लाख रुपये रक्कम शासनाकडून शेतकरी यांचे बँक खात्यावर पाठविण्यात आलेले आहे .

माहे सप्टेंबर महिन्यातील दुसऱ्या टप्प्यात नुकतेच अनुदान प्राप्त झाले असून मागील दोन दिवसापासून परळी तालुक्याचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार महेश वाकडे, पंडित सुरवसे ,परवीन पठाण आणि महसूल प्रशासनाचे सर्व 38 सजे व 104 गावांचे तलाठी व मंडळ अधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे सर्व कार्यालयीन कर्मचारी व कोतवाल हे अक्षरशः रात्रदिवस शिल्लक शेतकऱ्यांच्या अनुदान याद्या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्याकरिता अहोरात्र काम करत असून सप्टेंबर महिन्यातील 18 कोटी अनुदानापैकी 14 कोटी 33 लाख रुपये अनुदानाच्या शेतकऱ्यांच्या याद्या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यात आलेले आहेत व उर्वरित अनुदान रकमेच्या यादया







देखील युद्धपातळीवर रात्रंदिवस कामकाज करून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे कामकाज सुरु आहे. या अनुषंगाने बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन , अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, अंबाजोगाईच्या अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे, बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे दररोज ऑनलाईन व्हीसी द्वारे आढावा बैठक घेऊन शेतकरी याद्या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करून दिवाळी पर्यंत कोणत्याही परिस्थितीत अनुदान वितरित करणे करिता पाठपुरावा करत आहेत. तसेच परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे साहेब तसेच माननीय मंत्री महोदया पंकजाताई मुंडे हया देखील सतत प्रशासनाच्या संपर्कात असून शेतकऱ्यांना दिवाळीच्या तोंडावर लवकरात लवकर अनुदान शेतकरी यांचे खातेवर जमा व्हावे यासाठी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करत आहेत. अतिवृष्टी व पूर यामुळे खरडून व गाळ साठवून नुकसान झालेल्या शेत जमिन नुकसानीचे सर्वेक्षण देखील तलाठी ,कृषी सहायक व ग्रामसेवक यांच्या पथकाकडून केलेले असून विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार या सर्व अहवालाची पाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अभियंता यांचे कडून पडताळणी करून लवकरच अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेले आहेत .सदरचे अहवाल देखील दीपावळी नंतर लगेचच सादर होणार आहेत. ऑगस्ट व सप्टेंबर 2025 मध्ये वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी बीड यांनी जनतेस उद्देशून संदेश व प्रेस नोट दिलेली आहे . तसेच सर्व बँकेस सूचना व आदेश दिलेले असून नैसर्गिक आपत्तीमध्ये प्राप्त झालेल्या पीक नुकसानीचे अनुदानातून कोणतीही वसुली न करणे बाबत तसेच शेतकऱ्यांचे बँक खाते होल्ड न करणे बाबत दिनांक 18 ऑक्टोबर 2025 रोजी स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. अनुदान यादीत नाव असलेल्या ज्या शेतकऱ्यांनी अद्याप संबंधित गावाचे तलाठी यांच्याकडे बँकेचे पासबुक व आधार कार्ड दिलेले नसतील तर ते तात्काळ देण्यात यावेत तसेच ज्या शेतकऱ्यांनी ॲग्री स्टॅग फार्मर आयडी काढण्यात आलेली नाही त्यांनी आपले फार्मर आयडी तात्काळ काढून घ्यावेत असे आवाहन व्यंकटेश मुंडे तहसीलदार परळी वैजनाथ यांनी केली आहे.

# महाराष्ट्राचे सामाजिक आणि राजकीय स्वास्थ्य संतुलन : काळाची गरज

**डॉ. भारत कऱ्हाड**

महाराष्ट्र हा संत, समाजसुधारक आणि विचारवंतांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर या महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांनी या भूमीने समाजाला समानता, शिक्षण आणि स्वातंत्र्याचे मूल्य दिले. परंतु आज महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात अस्वस्थतेचे आणि असमतोलाचे चित्र दिसत आहे. ज्या भूमीने सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांची पायाभरणी केली, तिथेच आता राजकीय स्वार्थ, जातीगत ताण आणि भ्रष्टाचाराचे सावट गडद झाले आहे. समाजाचे आणि शासनाचे आरोग्य बिघडलेले आहे, आणि या अवस्थेकडे संवेदनशीलतेने पाहणे अत्यावश्यक आहे.

राजकीय पातळीवर महाराष्ट्रात सत्तेचे गणित महत्त्वाचे ठरले आहे. पक्ष आणि आघाड्यांचे बदल आणि सत्तेसाठी चालणारी देवघेव ही नवी सामान्य परिस्थिती झाली आहे. लोकसेवेचा उद्देश बाजूला पडून राजकारण हे स्वार्थपूर्तीचे साधन बनले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी आणि ग्रामीण दारिद्र्य यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. सत्तेच्या समीकरणांच्या गुंत्यात लोककल्याण हरवले आहे. त्यामुळे शासन जनतेपासून दूर जाऊ लागल्याचे दिसत आहे.

भ्रष्टाचार ही दुसरी मोठी व्याधी आहे. शासनाच्या प्रत्येक स्तरावर भ्रष्टाचाराची संस्कृती मुरली आहे. कंत्राटी कामांतील गैरव्यवहार, निधींची गळती आणि अपारदर्शक निर्णयप्रक्रिया यामुळे सामान्य जनतेच्या अपेक्षा कोलमडतात. शेतकरी विमा भरपाईसाठी, विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी आणि नागरिक प्रशासनिक कामांसाठी वारंवार दारं ठोठावतात. शासनातील अधिकाऱ्यांची जबाबदारीची भावना कमी होत असून त्याचा परिणाम लोकशाहीवरील सर्वत्र झाला आहे.

ग्रामीण महाराष्ट्राचे प्रश्न अधिक गंभीर आहेत. पावसावर अवलंबून शेती करणारे शेतकरी आजही नैसर्गिक आपत्ती, बाजारभावातील चढउतार आणि अपुऱ्या नुकसानभरपाईने त्रस्त आहेत. शेतीवरील गुंतवणूक घटत आहे, आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या वाढत आहे. शासनाने जाहीर केलेल्या योजना कागदावर राहतात, प्रत्यक्ष अंमलबजावणीत अपयश येते. या ग्रामीण वेदनेमुळे समाजात असंतोष वाढतो आणि ग्रामीण-शहरी दरी अधिक रुंदावते.

सामाजिक पातळीवर स्त्री सक्षमीकरणाचा प्रश्न अजूनही अधुरा आहे. “लडकी बहीण रुसली” ही केवळ भावनिक हाक नाही, तर समाजातील विसंगतीचे प्रतीक आहे. महिलांसाठी अनेक योजना असूनही प्रत्यक्ष सुरक्षितता, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. कौटुंबिक हिंसा, भेदभाव आणि अन्याय आजही अस्तित्वात आहेत. स्त्रीचा सन्मान आणि तिच्या निर्णयक्षमतेला मान्यता देणे हे समाजाच्या आरोग्याचे मुख्य लक्षण आहे, परंतु ते अजूनही पूर्ण झालेले नाही.

जात आणि धर्मावर आधारित विभागणी वाढत चालली आहे. आरक्षणाच्या प्रश्नांवरून समाजघटकांमध्ये ताण निर्माण झाला आहे. ओबीसी, मराठा, धनगर आणि इतर मागासवर्गीयांच्या मागण्या न्याय्य असल्या तरी त्याचा राजकीय गैरवापर होत आहे. यामुळे समाजात संशय आणि वैरभावना वाढतात आणि महाराष्ट्राच्या संत परंपरेतील ऐक्य व सहिष्णुतेला धक्का बसतो.

माध्यमे आणि सोशल मीडिया समाजाचे आरसे आहेत, पण आज त्या आरशात प्रतिबिंबाऐवजी वेगळे दिसते. फेक न्यूज, ट्रोलिंग आणि अर्धवट माहिती यांनी जनतेचा दृष्टिकोन विकृत केला आहे. ‘सत्याचा शोध’ हा पत्रकारितेचा उद्देश राहिला नाही; तो आता ‘संवेदनांचा व्यापार’ झाला आहे. विकासाच्या मुद्द्यांऐवजी भावनांवर आधारित चर्चा होतात आणि या गोंधळामुळे लोकशाहीतील विवेकी संवाद हरवला आहे.

राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचा थेट परिणाम लोकांच्या मानसिक आरोग्यावर झाला आहे. बेरोजगारी, आर्थिक दडपण आणि सामाजिक ताण यामुळे नैराश्य वाढले आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक आहे. समाजात सहकार्याऐवजी स्पर्धा आणि संशय वाढले आहेत. हा मानसिक थकवा हीच सामाजिक आरोग्याची सर्वात मोठी हानी आहे.

महाराष्ट्राचे सामाजिक आणि राजकीय स्वास्थ्य बिघडवणारे कोण याचे उत्तर एकच नाही. राजकारणी, अधिकारी, माध्यमे आणि नागरिक — हे सर्व घटक या स्थितीस कारणीभूत आहेत. पण दोष देण्यात अर्थ नाही; उपाय शोधणे हेच खरे उत्तर आहे.

या स्थितीवर मात करण्यासाठी शिक्षणात मूल्याधारित नागरिक घडविणे अत्यावश्यक आहे. शासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करणे, समाजात संवाद आणि सहिष्णुतेचा पुनर्जन्म घडविणे, आणि राजकारणात नीतिमत्ता व दीर्घकालीन दृष्टीकोन रुजविणे या चार दिशा आवश्यक आहेत.

महाराष्ट्र अजूनही संस्कृती आणि विचारांच्या मातीत उभा आहे. जर आपण प्रामाणिक आत्मपरीक्षण केले, लोकांच्या तक्रारी ऐकल्या, आणि राजकारणाला पुन्हा लोकसेवेचे साधन बनवले, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रकाशात उजळू शकतो. हाच बदल समाजाचे आणि शासनाचे खरे स्वास्थ्य पुनर्संचयित करेल.

**डॉ. भारत कऱ्हाड**

## महाराष्ट्राचे सामाजिक आणि राजकीय स्वास्थ्य संतुलन : काळाची गरज

**डॉ. दशरथ भोसले**

पुण्याच्या वाडा संस्कृतीत वयाची पस्तीस वर्षे घालवली, त्यामुळे पैसे कमी असले तरी आनंदाने कसे जगायचे आणि प्राप्त परिस्थितीत समाधान मानायचे, हे संस्कार आमच्या पिढीला लाभले. भले आज आम्ही बंगल्यात किंवा फ्लॅटमध्ये राहत असू, तरी ते आनंदी, उत्साहाचे, माणुसकीचे दिवस विसरता येणार नाहीत. वाडा संस्कृतीत अगदी पाडवा सणापासून शिमगोत्सवापर्यंत प्रत्येक सण जोशपूर्ण आणि उत्साहात साजरा केला जायचा.

दसरा झाला की, आम्हा मुलांना त्या काळी आता वीस दिवसांनी दिवाळी येणार याचे वेध लागायचे. मग शाळेतून आलो की वाड्याच्या मध्यभागी असलेल्या मोकळ्या जागेत आम्ही जमायचो. कोणता किल्ला करायचा, आकाशकंदील कोणी कसा करायचा, यावर तासनतास चर्चा व्हायची. आमच्या खोल्या लहान असल्या, तरी घरात पाच-सहा मुले, आई-वडील, काका-काकू आनंदाने एकत्र राहत असायचे.

दिवाळीचा पहिला दिवस म्हणजे रमा एकादशीला आकाशकंदील लावलाच पाहिजे. किल्ला तयार करुन चित्रे मांडली पाहिजेत, यासाठी आमचे नियोजन असायचे. किल्ला करण्यासाठी दगड, माती, पोती जमवून सुरुवात व्हायची. प्रत्येकजण दोन-तीन फूट लांब-रुंदीचा किल्ला करायचा. छत्रपती शिवाजी महाराजांना बसण्यासाठी उंच जागा, किल्ल्यावर जाण्यासाठी पायऱ्या, बुरुज, चोर दरवाजा, खाली मोकळी जागा, शेती, विहीर, वाघासाठी गुहा, कुस्ती खेळण्यासाठी तालीम — अशा बारकाईने किल्ल्याची रचना होत असे. भिंतीवर किल्ल्याचे नाव लिहिले जायचे — राजगड, तोरणा, सिंहगड, रायगड... सगळे किल्ले जवळपास सारखेच दिसायचे. किल्ला पूर्ण झाला की त्यावर हळीव पेरायचे; चार दिवसांत किल्ला छान हिरवागार दिसायचा.



आकाशकंदील बनवण्यातही निकोप स्पर्धा असायची. मंडईला लागूनच बुरुडआळी होती, तिथून काठ्या आणायच्या. कोणाचा चौकोनी, कोणाचा षटकोनी, कोणाची चांदणी, कोणाचे विमान — असे सांगाडे तयार झाले की त्यावर रंगीत कागद चिकटवायचे. त्या वेळी फेव्हीकॉल, गम मिळत नसे; मग गव्हाच्या पिठाची खळ करून वापरायची. वाड्यात वीज नव्हती, म्हणून आकाशकंदिलात उजेडासाठी पणती ठेवण्यासाठी जागा केली जायची. मग स्पर्धा सुरु व्हायची — कोणाचा कंदील उंचावर असेल ते पाहण्यासाठी!

किल्ला झाला, आकाशकंदील झाला की फटाके खरेदीची तयारी सुरु व्हायची. आमच्या वेळी मिळणारे तडतडी, चमनचिडी, मिरची असे फटाके आता गायब झाले आहेत. टिकल्या, फुलबाजे, सुदर्शन चक्र, लाल किल्ला, लवंगी फटाके वगैरे मिळायचे. वडील आम्हा भावंडांना टिकल्याची डबी, फुलबाजे, सुदर्शन चक्र, लवंगी फटाके वाटून द्यायचे. मोठे फटाके आणि सुतळी बॉम्ब मोठी माणसे लावत असत. टिकल्या वाजवण्यासाठी सांडशी आणून दगडावर आपटायचो. कधी आईचा ओरडा खायचो.

फटाक्यांचा दिवस संपला की, न वाजलेले फुसके फटाके शोधायचे. त्यातील दारु एका कागदावर ठेवून तो पेटवायचा. दिवाळीत वाटणीला आलेल्या फटाक्यांपैकी काही तुळशीच्या लग्नासाठी राखून ठेवायचे.

आमचं किल्ला आणि कंदीलाचं काम झालं की, आईला दिवाळीच्या फराळासाठी मदत करायची आठवण यायची. चकल्या करण्याचा साचा, खोबरे किसायची किसणी — या वस्तू दोन घरातच असायच्या. त्या मिळवण्यासाठी नंबर लागायचा. वाड्यातील महिला एकमेकींच्या घरी जाऊन फराळाचे पदार्थ करत असत. वीज नसल्याने दिवे लागणीला चुलीतील राख घेऊन कंदीलाच्या काचेस साफ करायचे. रॉकेल भरुन झाल्यावर कंदिलाच्या उजेडात फराळ केला जायचा.

त्यावेळी स्टोव्ह, गॅस नव्हता. प्रत्येकाच्या घरात चूल असायची. चुलीचा फायदा असा की, आईचं काम झाल्यावर निखारे तांब्यात टाकून कपड्यांना इस्त्री करता यायची. सुके खोबरे किसताना “म्हातारी” म्हणून जाडसर भाग शेवटी खायला मिळायचा — तो अतिशय गोड वाटायचा. आई रात्रभर जागून फराळ करत असे.

दिवाळीचा सगळ्यात महत्त्वाचा दिवस म्हणजे नरक चतुर्दशी. आई पहाटे उठून बंब तापवायची, आम्हाला उठवायची. कोण पहिले फटाके वाजवतो याची उत्सुकता असायची. घरात मोरी नसल्याने उघड्यावर आंघोळीसाठी बसावे लागे. आई उघड्यावर उटणे लावायची. थंडीने कुडकुडायचो; आईने गरम पाणी ओतले की बरे वाटायचे. त्या काळी मोती साबण नव्हता.

आंघोळ झाली की नवीन कपडे घालायचे — वाढत्या मापाचे, म्हणजे दोन वर्षे टिकतील असे. फटाके उडवताना फार मजा यायची. आमच्या वाड्यात झेंडे कुटुंब होते; त्यांचे काका फार कंजूष. त्यांच्या मते फटाके उडवणे म्हणजे पैशांची नासाडी. त्यांच्या मुलांना ते सांगायचे — “भोसलेंच्या मुलांनी फटाके उडवले तर आवाज येणार हो, तू फटाके उडवले तर ठो!” मग ती मुले फक्त अंगणात उभी राहून फटाक्यांचा आवाज ऐकायची!

नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा झाला की भाऊबीज. वाड्यातील सगळ्या घरात भाऊबीज सुरू असायची. आम्हाला बहिण नव्हती; चुलत बहिण उशिराने यायची. तीने आम्हा भावांना ओवाळले की खूप आनंद व्हायचा. वडील दोन रुपये ओवाळणीसाठी द्यायचे. आईला भाऊ नसल्याने ती थोडी उदास असे.

नरक चतुर्दशीला सगळ्यांच्या आंघोळी झाल्यावर आई फराळ देवाला नैवेद्य दाखवायची. मग सगळे एकत्र फराळ करायचो. सकाळी नऊनंतर प्रत्येक महिला फराळाचे ताट शेजाऱ्यांना देत असे. फराळ म्हणजे लाडू, चकल्या, शंकरपाळे, करंज्या — आणि या बनवताना परस्पर मदत, हास्य आणि एकोप्याने काम चालायचं.

वाड्यात म्हसोबा देवळासमोर एक मोठं तुळशीवृंदावन होतं. तिथं तुळशीच्या लग्नाचं आयोजन व्हायचं. मंगळाष्टकांच्या वेळी एकमेकांच्या डोक्यावर अक्षता फेकायच्या. मग घराघरातून फराळ एकत्र करुन प्रसाद दिला जायचा. लग्न झालं की मुला-मुलींच्या लग्नाच्या चर्चा सुरु व्हायच्या.

आता जुने वाडे पडून अपार्टमेंट झाले. ऐशआरामी आयुष्यात आम्ही फ्लॅटच्या गॅलरीतून दिवाळीची मजा बघतो. आता कोणी आकाशकंदील करत नाही, कोणी फराळ घरी करत नाही — सगळं रेडीमेड मिळतं. कोणी कोणाकडे ताटं देत नाही; प्रत्येकजण आपला जगतो. दिवाळीच्या शुभेच्छाही मोबाईलवरच दिल्या जातात. वाडा संस्कृतीतील त्या दिवाळीच्या गोष्टी नातवंडांना सांगताना आम्ही त्या भूतकाळात हरवून जातो.

**डॉ. दशरथ भोसले, विनोदी कथा लेखक, दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली, जिल्हा** रत्नागिरी

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

# आगाऊपणाच्या आगे मागे

अमिताभ बच्चन सूत्रसंचालन करीत असलेल्या 'कौन बनेगा करोडपती' या कार्यक्रमात सध्या बच्चेकंपनी सहभागी होत आहे. इशित भट्ट हा अनेक सहभागींपैकी एक. त्याला 'हॉटसीट'वर बसायची संधी मिळाली आणि त्याने पहिल्याच प्रश्नापासून वातावरण 'ताप'वायला सुरुवात केली. 'मला नियम वगैरे समजावत बसू नका, थेट प्रश्न विचारा', 'पर्याय देऊच नका, मला उत्तर माहीत आहे', 'उत्तराच्या पर्यायावर एक नाही, चार-चार कुलपे ठोका', अशी त्याची वाक्ये आता रील्स, मीम्समधून सार्वत्रिक झाली आहेत. उत्तरांचे पर्याय दाखवण्याआधीच तो उत्तरे देऊन मोकळा होत होता, पण पाचव्या प्रश्नाला तो अडला आणि त्यानेच पर्यायांची विचारणा केली. त्यावर मग हशा पिकला. पर्याय दाखवल्यावर त्याने त्यातील एक उत्तर घाईघाईने देऊन टाकले, पण ते चुकले आणि तो स्पर्धेचा पहिला टप्पाही पार न करता स्पर्धेतून बाहेर पडला. इशितच्या या काही मिनिटांच्या दूरचित्रवाणी अस्तित्वाची गेले दहा दिवस चर्चा सुरु आहे. वास्तविक अमिताभ बच्चन यांनी इशितला त्यांच्या नेहमीच्या शैलीत अतिशय संयतपणे हाताळले. पण कदाचित म्हणूनच समाजमाध्यमांवर पहिल्या टिप्पण्या आल्या, त्या इशित बच्चन यांच्याशी अनादराने वागला, अशा. हा मुलगा अतिशय आगाऊ, उद्धट, हेकट आहे, वडीलधाऱ्यांशी कसे वागावे, हे याला माहीत नाही इथपासून टिप्पण्या सुरु होऊन याच्या आई-वडिलांनी याच्यावर नीट संस्कार केले नाहीत, इथपर्यंत गेल्या.या ढगफुटीसारख्या टिप्पणी वर्षावानंतर हळूहळू या मुलाला असे धारेवर धरु नका, असा एक सूर उमटलेला दिसतो. अनेक मानसतज्ज्ञ, लाइफ कोच वगैरे यात उतरले आहेत आणि ते या मुलाच्या निमित्ताने एकूणच सध्याच्या काळातील मुले आणि पालकत्व यावर भाष्य करताना दिसत आहेत. याचे सगळे नमुने विविध समाजमाध्यम मंचांवर आहेतच, त्यामुळे त्याची पुन्हा उजळणी करण्याचे कारण नाही. यानिमित्ताने चर्चा व्हायला हवी आहे, ती भारतातील मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवांची. इशितच्या निमित्ताने जे घडताना दिसते आहे, ते प्रत्येक जण इशितच्या वर्तनावर आणि पर्यायाने त्याच्या पालकांवर भाष्य करून, आपण म्हणतो तेच याचे ठोस उत्तर आहे, असे सांगण्याच्या स्पर्धेत उतरल्याचे. भाष्य करणारा प्रत्येक जण एक प्रकारे इशितसारखेच – 'पर्याय देऊ नका, मला उत्तर माहीत आहे' – असे पर्याय न ऐकताच एकमेकाला ऐकवतो आहे. पण, यावर ठोस असे एकच एक उत्तर नाही, ते का हे समजून घेणे गरजेचे.नवे सहस्राक सुरु झाल्यानंतरच्या गेल्या पाव शतकात तंत्रज्ञानाने मनुष्याचे जगणे बदलले, यात कुणाचे दुमत असायचे कारण नाही. त्याचे दुष्परिणाम बेदखल करून चालणार नाहीत, तशी त्यांची उपयुक्तताही नाकारून चालणार नाही. या दोन्हींत मेळ घालायला जमत नाहीये, ही खरी रड आहे. जेन झी किंवा जेन अल्फाचे या जगात स्वागतच मोबाइल, स्मार्टफोनने केले. साहजिकच तो आणि त्याच्यावरील सर्व तंत्रआयुधे ही त्यांच्या आयुष्याची सहयात्रिक आहेतच.



या तंत्रआयुधांचा वापर करून काढलेल्या छायाचित्रांत, चित्रफितींत आपण आणि आजूबाजूचे इतर कसे दिसतात, हे पाहतच ही पिढी मोठी झाली आहे, होत आहे. आरशात पाहण्यापेक्षा मोबाइलचा कॅमेरा सेल्फी मोडमध्ये टाकून स्वतःला पाहणारी ही पिढी आहे. त्यांची आणि ते इतरांची जोखू पाहत असलेली प्रतिमा यावर पोसली जाते आहे, 'स्व'-रुप पाहण्याची ताकद देणाऱ्या तात्त्विक जाणिवेवर नाही. सेकंदा-दोन सेकंदाला नवे दृश्य पाहण्याची सोय करून ठेवणारी ही तंत्रआयुधे जे दाखवतात, ते पाहताना त्यातील काय अधिक 'चांगले' दिसते, याचे पर्याय पाहणारे निवडत असतात. तो संस्कार त्यांच्या नकळत त्यांच्यावर होत असतो. ढोबळ मानाने सांगायचे, तर कोणते कपडे परिधान केल्याने आत्मविश्वास असल्याचा संदेश जातो इथपासून दुसऱ्याशी कसे बोलले तर वाहवा होते इथपर्यंतचे लाखो पर्याय स्मार्टफोन नावाचा पडदा पोस्ट, रील, मीम इत्यादी चित्रगुंतवळ्यातून देत असतो, पाहणाऱ्याला तसे व्हायला सुचवत असतो. अमुक एक असे करतो ते 'कूल' आहे, म्हणून केले पाहिजे, असे हे मूल्यमापन आहे. 'जो जे 'कूल', तो ते पाहो' असाच याचा नियम आहे. तो लक्षात ठेवून एखादा इशित जेव्हा स्वतःला त्याचे पडद्यावरचे दिसणे-असणे कसे असावे, हे कल्पून तसे कॅमेऱ्यासमोर दाखवायचा प्रयत्न करतो, तेव्हा जे होते, ते 'कौन बनेगा करोडपती'त घडले आहे. इशितने स्वतःला प्रदर्शित करताना, त्याला जे 'कूल' वाटले, त्याप्रमाणे केले असावे. त्याचे हे दर्शन ज्यांना तसे वाटत नाही, ते त्याच्या निंदेत गुंतले आहेत, काही त्याच्या वर्तनाचे विश्लेषण करून त्याचे उत्तर देण्यात, तर काही त्यावरून आधुनिक पालकत्वाचे अनघडपण अधोरेखित करून उपाय सुचवण्यात.जे दिसते, ते पाहणाऱ्यांना, या दिसण्यावर टिप्पण्या करण्याची मुभा नेहमीच असते, पण हे पाहणारे जेव्हा दाखवणारे होतात, तेव्हा पाहणाऱ्यांच्या टिप्पण्या या दाखवणाऱ्यांनी कशा स्वीकारायच्या याचे भान कोणतेच तंत्रआयुध देत नाही. पालकांची भूमिका काही असेल, तर ती इथे आहे, किमान हे भान देणारी. अलीकडच्या काळात एकुलत्या एक, स्वतःच्या घरातही पुन्हा स्वतःचा स्वतंत्र अवकाश असलेल्या मध्यमवर्गातील मुलांना 'जिवंत' सहजीवनात उमलण्याची संधीपेक्षाही गरजच उरलेली नाही, हे वास्तव आहे. हवे ते बसल्या जागी मिळते आहे, नको ते नाकारण्याची मुभा आहे आणि हा पर्याय वस्तूंप्रमाणेच जिवंत माणसांबाबतही आहे. याला स्वतःच्या मतांवर कोणत्याही गोंधळाविना ठाम असण्याची चांगली बाजू असली, तरी दुसऱ्याचेही मत असते आणि ते नाही पटले, तरी त्याचा आदर करायचा असतो, या सहअस्तित्वाच्या नियमाला थेट फाटा मिळण्याचा धोकाही आहे, जो इशितसारख्या एखाद्या 'एपिसोड'च्या निमित्ताने समोर येतो. पण, तरी उलटा विचार करू. इशित 'केबीसी'त जिंकला असता, तर अशाच प्रतिक्रिया उमटल्या असत्या का? त्या वेळी कदाचित त्याच्या या अशा 'दिसण्या'चे स्मार्टनेस म्हणून कौतुक झाले असते. कुणी सांगावे, मुलाचा लहानपणापासूनच सामान्यज्ञानाचा किती चांगला अभ्यास करून घेतला आहे, असे म्हणून त्याच्या पालकांचीही पाठ थोपटली गेली असती! असो! इशितचा भाग प्रदर्शित झाल्याने वाहिनीचे तेवढे फावले असणार. वास्तविक त्यांच्याकडे हा भाग न दाखवण्याचा – किंवा किमान त्याचे ते कथित उर्मट वर्तन पडद्यावर न आणण्याचा- पर्याय होताच की. तरीही त्यांनी तो न स्वीकारण्यामागे यानिमित्ताने चर्चा घडून, प्रेक्षकसंख्या वाढण्याच्या शक्यतांकडे डोळा असू शकतो. इशितच्या निमित्ताने उठलेल्या वादळावर ठोस उत्तर नाही, ते यामुळेच. पडद्यावरच्या कथित आगाऊपणाच्या आगेमागे इतके काय काय 'दिसते' आहे, 'पाहण्या'ची इच्छा असेल, तर किमान त्या वादळाने आपल्यासमोर आणलेला प्रश्न तरी नेमका कळेल!

## औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची तिसरी फेरी सुरू

मुंबई : औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी) अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या फेरीनंतर तब्बल 24 हजार 804 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले असून, तिसऱ्या फेरीच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. तिसऱ्या फेरीसाठी 20 जार 363 जागा रिक्त आहेत.

भारतीय औषधनिर्माणशास्त्र परिषदेकडून (पीसीआय) महाविद्यालयांना मान्यता देण्यास झालेला विलंब, पायाभूत सुविधा नसल्याने पदवीच्या 18 महाविद्यालयांवर प्रथम वर्षाच्या प्रवेशावर घातलेली बंदी अशा अनेक अडचणीनंतर सुरु झालेली औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडत आहे.औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीकृत प्रवेशासाठी 44 हजार 287 जागांसाठी राज्यभरातून 55 हजार 116 विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यातील 38 हजार 462 विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरला होता. पहिल्या फेरीमध्ये 16 हजार 670 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले, तसेच नुकत्याच पार पडलेल्या दुसऱ्या प्रवेश फेरीमध्ये 8 हजार 134 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. दोन्ही फेऱ्यांमध्ये मिळून 24 हजार 804 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. तिसऱ्या फेरीसाठी 20 हजार 363 जागा रिक्त राहिल्या आहेत.औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची तिसरी फेरी सुरु झाली असून, 24 ऑक्टोबरपर्यंत विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरता येणार आहे. निवड यादी 27 ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे. तसेच निवड यादीमध्ये प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांना 28 ते 30 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 5 पर्यंत प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश घ्यायचा आहे. त्यानंतर चौथ्या फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील 31 ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे.चौथी प्रवेश फेरी 1 ते 10 नोव्हेंबर या कालावधीमध्ये राबविण्यात येणार असून,

## पान 1 वरुन

पूरक दिवाळी साजरी करु, असे त्या म्हणाल्या.

यावेळी पंकजाताई मुंडे यांनी मुलांसोबत आकाशकंदील तयार केले. तसेच पणत्या रंगवल्या आणि चित्रकला उपक्रमात सहभागही घेतला. छोट्या हातांनी केलेल्या सृजनातून व्यक्त झालेला उत्साह आणि निरागसतेचा झरा पाहून त्या भावूक झाल्या.

---

शेतकऱ्यांसोबत पिठलं, भाकरी व ठेचा खाऊन आंदोलन करणार आहे.अतिवृष्टीने राज्यातील 30 जिल्ह्यातील 350 तालुक्यात सर्व वाहून गेले आहे. लाखो एकर शेतीचे नुकसान झाले आहे. हेक्टरी 50 हजार रुपये, जमीन खरडून गेली त्यासाठी हेक्टरी 5 लाख रुपये व कर्जमाफी करण्याची मागणी काँग्रेस पक्षाने लावून धरली होती, पण भाजपा महायुती सरकारने जुन्याच योजनांची गोळाबेरीज करून 32 हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले, पण हे पॅकेज फसवे निघाले आहे. शेतकऱ्यांना दिवाळीच्या आधी मदत देण्याचे आश्वासनही फेल गेले असून सरकारचा निषेध करण्यासाठी काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांबरोबर पिठलं भाकर आंदोलन करणार आहे. सर्व जिल्हे, तालुका व गावागावात हे आंदोलन केले जाणार असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसने दिली आहे.

---

ठाण्यात गुन्हा जयंत पाटील, पंडीत उर्फ सुभाष पाटील आणि अभिजित कडवे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. अलिबाग पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांनी या प्रकरणाचा तपास करून अलिबाग येथील न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

या प्रकरणाची सुनावणी अलिबागच्या मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती एम बी अत्तार यांच्या न्यायालयात सुरु होती. सुनावणी दरम्यान एकूण 13 जणांच्या साक्षी नोंदणवण्यात आल्या, यात फिर्यादी, तपासिक अंमलदार, पंच आणि साक्षीदार यांच्या साक्ष महत्वाच्या ठरल्या, दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने माजी आमदार जयंत पाटील यांना भारतीय दंड विधान कलम 323 अन्वये दोषी ठरवले. त्यांना तुरुंगात पाठवण्याऐवजी अपराध प्रतिबंधक कायद्यानुसार एक वर्ष चांगल्या वर्तणुकीचे हमी पत्र लिहून देण्याचे तसेच 5 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

---

निर्णयाच्या जीआर वरुन मराठा (Maratha) समाजामध्येच मतभेद आहेत. अनेक अभ्यासक आणि मराठा समाजातील नेत्यांनी हा जीआर फसवा असल्याचा आरोप करत सरकारच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे.दरम्यान हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयावरुन राज्यातील ओबीसी समाज संतप्त झाला आहे. विशेषत: ओबीसी नेते म्हणून ओळखले जाणारे सरकारमधील मंत्री छगन भुजबळ, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार व इतरांनी सरकारच्या गॅझेट लागू करण्याच्या निर्णयाविरोधात एल्गार पुकारला आहे. बीडमध्ये आधी रद्द झालेली ओबीसींची महाएल्गार सभा काल पार पडली. या सभेच्या माध्यमातून धनंजय मुंडे, छगन भुजबळ, लक्ष्मण हाके, सत्ताधारी पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर या सगळ्याच नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर आक्रमकपणे टीका केली.मराठा समाजाच्या आरक्षणाला आपला विरोध नसल्याचे सांगतानाच आमच्या ताटातून मात्र कुणालाही देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका महाएल्गार सभेतून ओबीसी नेत्यांनी मांडली. राज्यातील ओबीसी नेत्यांचा चेहरा म्हणून छगन भुजबळ यांच्या बरोबरीने पंकजा मुंडे यांचे नाव घेतले जाते. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी राज्यात ओबीसी समाजाची मोट बांधत वोट बँक भक्कम केली होती.ओबीसी समाज हा कायम भाजपाच्या पाठीशी राहिला. ओबीसी हाच भाजपचा डीएनए असल्याचे राज्यातील नेते जाहीर सभांमधून सांगतात. मात्र आज हाच ओबीसी समाज आमच्यावर अन्याय झाला, आमचे आरक्षण धोक्यात आले असे म्हणत सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरला आहे. ओबीसीतून मराठा आरक्षणाची मागणी करत मनोज जरांगे पाटील यांनी दोन वर्षांपूर्वी अंतरवाली सराटीतून आंदोलनाला सुरुवात केली. त्याला विरोध म्हणून ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मराठवाड्यातील जालन्यातून महाएल्गार पुकारला होता.

या सभेत व्यासपीठावर छगन भुजबळ यांच्यासोबत पंकजा मुंडे यांचे नाव आणि बॅनर वर फोटो देखील छापण्यात आले होते. मात्र पंकजा मुंडे यांनी या महाएल्गार सभेकडे पाठ फिरवली. त्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री असलेल्या पंकजा मुंडे यांनी काल दुसऱ्यांदा छगन भुजबळ आणि ओबीसी समाजाचे व्यासपीठ टाळल्याची चर्चा त्यांच्या गैरहजेरीनंतर राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे. दसरा मेळाव्याच्या भगवान भक्ती गडावरील भाषणात पंकजा मुंडे यांनी मराठा आरक्षण विषयावर आपली भूमिका स्पष्टपणे मांडली होतीमराठा आरक्षणाला विरोध नाही परंतु ओबीसीच्या ताटातलं कुणाला देता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. बीड मधील कालच्या महाएल्गार सभेला पंकजा मुंडे येणार अशी चर्चा होती. परंतु पंकजा मुंडे या सभेला आल्याच नाही. त्यांच्या या गैरहजेरीमागे त्यांचे मंत्रिपद हे मोठे कारण असल्याचे बोलले जाते. महायुती सरकारमध्ये मंत्री असताना सरकारनेच घेतलेल्या एखाद्या निर्णयाच्या विरोधात होत असलेल्या सभेत जाऊन भाषण करणे किंवा भूमिका मांडणे योग्य नाही.कॅबिनेटमध्ये आपण आपली भूमिका वेळोवेळी मांडत आलो आहोत, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. दरम्यान महाएल्गार सभेत ओबीसी नेत्यांनी केलेली भाषण आपण ऐकली नाही त्यामुळे त्यावर भाष्य करणार नाही. मराठा आरक्षणावर आपण आपली भूमिका अनेकदा मांडली आहे, त्यामुळे यावर आता अधिक बोलणे उचित होणार नाही असे सांगत पंकजा मुंडे यांनी ओबीसींच्या महालगार सभेच्या वादापासून स्वतःला दूर ठेवणेच पसंत केले. दरम्यान, राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी काल पंकजा मुंडे काल त्यांच्या निवासस्थानीही गेल्या होत्या.2024 मध्ये राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष टोकाला गेलेला होता. याच दरम्यान लोकसभेच्या निवडणुका झाल्या आणि मराठा विरुद्ध ओबीसी वादाचा फटका पंकजा मुंडे यांना बीडमध्ये बसला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बजरंग सोनवणे यांनी त्यांचा पराभव केला आणि महायुतीची हमखास निवडून येणारी बीडची जागा भाजपाने गमावली. तेव्हापासून मराठा विरुद्ध ओबीसी आरक्षण वादामध्ये उघडपणे फारशी भूमिका घ्यायची नाही, असेच पंकजा मुंडे यांचे धोरण राहिले आहे..

---

(तात्या) गडदे यांच्या राजकीय आयुष्यातील 33 वर्षातील आनंदाचा हा क्षण असुन गेली 60 वर्षांपासुन मोडकळीस आलेल्या इमारतीचा नेत्रदिपक सोहळा पार पडतोय याचा प्रचंड

---

शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून होणार आहे. तर यंदा दोन टर्ममध्ये ही परीक्षा घेतली जाणार असून फेब्रुवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या रविवारी इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थांच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जाणार आहे. तर एप्रिल-मे मध्ये चौथी आणि सातवीसाठी कोणत्याही रविवारी होईल. दरम्यान चौथी आणि पाचवीसाठी 16 हजार 693, तर सातवी आणि आठवीसाठी 16 हजार 588 शिष्यवृत्ती संच मंजूर करण्यात आले आहेत.नव्या निर्णायत आणखी एक बदल करण्यात आला असून आता येथून पुढे पास नापास ऐवजी पात्र किंवा अपात्र असे घोषित केलं जाणार आहे. या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रत्येक पेपरमध्ये किमान 40 टक्के गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे. तर शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 200 रुपये, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 125 रुपये शुल्क असेल. तर शाळांनाही प्रतिवर्षी 200 रुपये शुल्क जमा करावे लागेल.

## पान 4 वरुन

पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही त्यांना मदत त्वरित व कार्यक्षम पद्धतीने वितरीत होईल असंही मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले.

---

येणार आहे. ही शोभायात्रा अंबाजोगाई शहरातील मुख्य मार्गावरुन योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंडकडे जाईल, ज्यामुळे शहरातील वातावरण भक्तिमय होईल.

यावेळी आ. नमिता मुंदडा यांनी सर्व भक्तजनांना या महत्त्वपूर्ण धार्मिक यज्ञात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. "या ज्ञानयज्ञात सहभागी होऊन सर्व भक्तजनांनी आध्यात्मिक ज्ञान आणि सकारात्मक ऊर्जा अनुभवावी," अशी मनःपूर्वक विनंती त्यांनी केली.

दिव्य ज्योती जागृती संस्थानच्या या उपक्रमाने अंबाजोगाई आणि परिसरातील भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यज्ञाच्या माध्यमातून श्रोत्यांना देवी भागवत महापुराणातील गहन ज्ञान आणि आध्यात्मिक शांतीचा अनुभव मिळणार आहे.

---

जात आहे. यशवंत सेनेचे भारत सोन्नर यांनी घटनास्थळाला भेट दिली असून हे बलिदान व्यर्थ जाणार नाही, सरकारला याची किंमत चुकवावी लागेल, असं म्हणत आतातरी सरकारने डोळे उघडावे आणि धनगर समाजाला एसटी प्रवर्गात सामावून घ्यावे. मादळमोही येथील योगेश बबन चौरे हा 33 वर्षीय तरुण हॉटेल व्यवसाय करत आपल्या कुटुंबियाचा उदरनिर्वाह करत असे. गेल्या काही दिवसांपासून तो धनगर समाजाच्या आरक्षण लढ्यातही सक्रिय पहावयास मिळत होता. आज पहाटेच्या दरम्यान योगेशने घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याच्या खिशामध्ये एक चिठ्ठी सापडली असून त्यात मी योगेश बबन चौरे धनगर समाजाला एसटी मध्ये आरक्षण मिळत नसल्यामुळे मी आत्महत्या करत आहे, असे त्याने लिहिले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस डेरेदाखल झाली आहे. अन्य अधिकारीही घटनास्थळी असून दुपारी एक वाजेपर्यंत योगेशच्या पार्थीवदेहावर अंत्यसंस्कार झालेले नव्हते. याची माहिती यशवंत सेनेचे भारत सोन्नर यांना झाल्यानंतर त्यांनी मादळमोही येथे जात कुटुंबियांची भेट घेतली. गेल्या 20 वर्षांपासून आपण धनगर समाजाला एसटीमध्ये सामावून घ्यावे यासाठी यशवंत सेनेच्या माध्यमातून लढा देत आहोत, समाज बांधव या लढ्यामध्ये गेल्या कित्येक वर्षांपासून सक्रिय आहेत. मात्र शासन या महत्वाच्या आणि न्यायिक मागणीकडे दुर्लक्ष करत आहे. आज समाजातील योगेश याने आत्महत्या केली आहे, त्याचे बलिदान व्यर्थ जाणार नाही. त्याचा हिशोब सरकारकडून घेतला जाईल, असं म्हणत भारत सोन्नर यांनी धनगर समाजाच्या भावना लक्षात घेऊन एसटीमध्ये समावेश करावा, नसता पुढचा लढा हा तीव्र स्वरुपाचा असेल असा इशाराही त्यांनी दिला.

---

आयटीआय कॉलेज ची सुरुवात 2023 पासून दिवसेंदिवस विद्यार्थी व पालकांच्या पसंतीला हे कॉलेज उतरले असून सलग दुसऱ्या वर्षी या कॉलेजने प्रवेशाचा शंभर टक्के टप्पा पूर्ण केल्याची माहिती दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष युवा नेते माधव मुंडे सर यांनी दिली आहे. या संस्थेच्या प्रगतीमध्ये प्राचार्य सोमेश मुंडे सर ज्ञानेश्वरी फड मॅडम, कातकडे सर, गोविंद दहिफळे सर, चव्हाण मॅडम, कवडेकर सर,अक्षता मुंडे मॅडम,सोमनाथ गीते सर, पिंपळे सर, ओटले सर,संजय फड सर,गितेश फड सर, करुणा मॅडम, आरती मॅडम, वसंत होलबे आदी कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली..

---

हडपसर ते हुजूर साहिब नांदेड विशेष गाडी दिनांक 21 ऑक्टोबर, 2025 आणि 28 ऑक्टोबर 2025 मंगळवारी हडपसर रेल्वे स्थानकावरुन रात्री 22.50 वाजता सुटेल आणि दौंड, लातूर, परळी, परभणी मार्गे हुजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी दुपारी 12:15 वाजता पोहोचेल.

या गाडीत 22 डब्बे असतील.

---

सुमारास राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येचे कारण स्पष्ट होऊ शकले नाही. मृतदेहावर जिल्हा रुग्णालयामध्ये शवविच्छेदन करण्यात आले.

---

बीड, नेकनूर, पेंडगाव, पारगाव सिरस, मांजरसुंबा, येळंबघाट, चऱ्हाटा, नाळवंडी म्हाळस जवळा, पाली, लिंबागणेश, चौसाळा घाटसावळी, राजुरी नवगण पिंपळनेर आणि कुर्ला या मंडळांतील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई वितरित केली जाणार आहे. प्रत्येक तालुक्यात महसूल, कृषी आणि पंचायत विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली संगणकीकृत प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात येत आहे तहसील कार्यालयांत विशेष नियंत्रण कक्ष उभारण्यात आले असून, प्रत्यक्ष पडताळणीनंतरच निधी वर्ग केला जात आहे. प्रशासनाची तयारी व बैठकींचा आढावा बीड तहसीलदार यांच्या कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सायंकाळी स्वतः अनुदान वाटपाचा आढावा घेतला उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे तसेच महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी, संगणक ऑपरेटर यावेळी उपस्थित होते संगणक प्रणालीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची माहिती तपासून पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्यात येत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले की "एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये आणि मदत वाटप पारदर्शक पद्धतीनेच व्हावे", मदत वितरणासाठी संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन पार पडेल तसेच बँक खात्यांमध्ये थेट निधी जमा होणार आहे. शासनाने दिलेल्या सूचनांनुसार लाभार्थ्यांची यादी तहसील व जिल्हाधिकारी यांच्या देखर खीखाली तपासावी कोणत्याही अपात्र व्यक्तीस मदत मिळणार नाही याची खात्री करावी मदत देताना सर्व निकष व शासन निर्णयातील नियमांचे पालन आवश्यक आहे निधीच्या वापरावर लेखा परीक्षण कार्यालय आणि महालेखापाल कार्यालयाची नजर राहणार आहे. शासन निर्णयानुसार, ही मदत आर्थिक वर्ष 202526 मधील उपलब्ध निधीतून वितरित केली जाणार असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीची रक्कम जमा होणार असून, कृषी उत्पादन पुनर्संचयित करण्यासाठी ही मदत महत्त्वाची ठरणार आहे. राज्य शासनाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना वेळेवर मदत देण्यासाठी प्रशासन सज्ज राहावे, असे निर्देश महसूल विभागाचे सह सचिव संपत सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

---

पाळेमुळे रुजवली, त्याच वाटेवर चालत लोकनेत्या पंकजा मुंडे यांनी राज्यभर यात्रांच्या माध्यमातून भाजपचा विचार घराघरात पोहोचवला. त्यांच्या नेतृत्वात आणि डॉ. प्रितम मुंडे यांच्या सहकार्याने बीड जिल्ह्यात आज भारतीय जनता पार्टी ही अजेय संघटना बनली आहे. स्थानिक पातळीवर परस्पर समन्वय साधून जिथे ताकद, तिथे उमेदवार या तत्वावर निवडणूक लढविण्याचा निर्णय झाल्याचेही स्पष्ट केले.

---

आमदार सौ. नमिताताई मुंदडा या त्यांच्या मतदारसंघातील विकासकामांसाठी नेहमीच सक्रिय असतात. त्यांची या महत्त्वपूर्ण पदावर निवड झाल्यामुळे, महाविद्यालयाच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि ग्रामीण रुग्णालयाच्या आरोग्य सेवांच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे अनुभव आणि रुग्णसेवेबद्दलची त्यांची तळमळ यामुळे या संस्थेच्या प्रगतीला निश्चितच हातभार लागेल.

या निवडीबद्दल शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. "योग्य व्यक्तीची योग्य ठिकाणी निवड झाली आहे," अशा शब्दांत सर्वसामान्य नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. या निवडीमुळे वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाईच्या विकासाला अधिक गती मिळून परिसरातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा नागरिकां मधून व्यक्त होत आहे.

---

विनापरवाना पिस्तूल आले कुठून, कोणी अज्ञात कारणांसाठी गोड बोलून निर्मनुष्य जागेवर त्याची हत्या केली की त्याने आत्महत्या केली, याबाबतचे गुढ अद्याप कायम आहे.

या घटनेमागे घातपात असण्याची शक्यता वर्तवली जात असून, परिसरात याबाबत जोरदार चर्चा सुरु आहे. घटनास्थळी आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे, अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे, आदिनाथ भडके यांच्यासह पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे, पोलीस अंमलदार शिवदास केदार, अमोल ढवळे आणि अन्य पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.

---

या भागाचे नेते माधव ( तात्या ) निर्मळ यांची लोकप्रियता पडलेले मतदान सामान्य माणसात वावरणारे गरिबीची जाण असणारे व अठरा पगड जातीला बरोबर घेऊन शाहु फुले आंबेडकरांचे विचार रुजवणारे श्री माधवजी निर्मळ असल्याने त्यांच्या पाठीमागे आपण उभे राहुन राजकिय बळ तात्यांना द्यायचे हा संकल्प माजलगाव मतदार संघातील नेत्यांनी कार्यकर्त्यांनी अवलंबिला असल्याचे दिसुन येत आहे त्यामुळे माजलगाव मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार पडुन या मतदार संघामध्ये भाजपाची ताकत वाढणार असल्याचे बोलले जाते

---

बाजीराव घाडगे, कालीदास भाऊसाहेब घाटगे, भारत बाजीराव घाडगे, रावसाहेब बाजीराव घाडगे, केशव कल्याण घाटगे, आप्पा विलास घाटगे, राधाबाई कल्याण घाडगे, उषाबाई बिलास घाडगे, अर्चना दिपक घाडगे, पारुबाई भारत घाडगे, अरुणा रावसाहेब घाडगे, भिवराबाई भाउसाहेब घाडगे या सर्व लोकांनी रस्ता अडवून, पाण्याची पाईप लाईन खोदुन दुनघव कुटुंबीयांची अवहेलना केली. तसेच, या कृतीमुळे येथील दलित वस्तीला विकासात्मक जीवनावश्यक सुविधा आणि योजनांपासून वंचित ठेवले जात असल्याचे रामा लक्ष्मण दुनघव यांनी निवेदनात म्हटले आहे.

'आझाद क्रांती सेने'ची आक्रमक मागणी:

या प्रकरणात 'आझाद क्रांती सेने'चे तालुका प्रमुख शरद थोरात यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की,

पूर्वजांपासून असलेली दलित वस्तीतील ही वहिवाट 7 दिवसांच्या आत खुला करून द्यावा.

वस्तीवर राहणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याची सोय तातडीने उपलब्ध करून द्यावी.

रस्ता अडवणाऱ्या लोकांकडून दुनघव कुटुंबीयांना धोका असून त्यांच्यावर दररोज जातीवाचक शिवीगाळ होत असल्यामुळे संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी.

तातडीने स्पॉट पंचनामा करून पीडितांना योग्य तो न्याय देण्यात यावा.

आमरण उपोषणाचा इशारा:

प्रशासनाने निवेदनाची तातडीने दखल घेऊन, चौकशी लावून, सात दिवसांच्या आत सदरील वहिवाटीचा रस्ता खुला न केल्यास, दिनांक 28/10/2025 रोजी दुनघव कुटुंबीय त्यांच्या पाळीव प्राण्यांसह केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करतील, असा इशारा रामा लक्ष्मण दुनघव यांनी प्रशासनाला दिला आहे. तालुका प्रमुख शरद थोरात यांनी या मागण्या लावून धरल्या असून प्रशासनाच्या भूमिकेकडे आता लक्ष लागले आहे.

---

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पूरग्रस्त जिल्ह्यांना १३५६ कोटींची मदत; राज्य सरकारचा शासन निर्णय



मुंबई - सप्टेंबर 2025 मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील 21 लाख 66 हजार 198 शेतकऱ्यांच्या 15 लाख 16 हजार 681.21 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी 1356 कोटी 30 लाख 22 हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. कोल्हापूर - जिल्ह्यातील पाच हजार 860 शेतकऱ्यांच्या एक हजार 696.36 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी तीन कोटी 18 लाख रुपये

बीड - आठ लाख सहा हजार 513 शेतकऱ्यांच्या सहा लाख 44 हजार 918.55 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी 577 कोटी 78 लाख 92 हजार रुपये.धाराशिव - चार लाख चार हजार 656 शेतकऱ्यांच्या तीन लाख 11 हजार 291.23 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी 292 कोटी 49 लाख 22 हजार रुपये

लातूर - चार लाख 15 हजार 492 शेतकऱ्यांच्या 23 लाख सहा हजार 628.99 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी 202 कोटी 38 लाख 19 हजार रुपयेपरभणी - चार लाख 39 हजार 297 शेतकऱ्यांच्या दोन लाख 85 हजार 853.78 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी 245 कोटी 64 लाख 49 हजारनांदेड - 83 हजार 267 शेतकऱ्यांच्या 32 हजार 73.02 हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी 28 कोटी 52 लाख 37 हजार रुपये.दरम्यान, नैसर्गिक आपत्तीत मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदत थेट जिल्हास्तरावरुनच दिली जाणार आहे. त्यामुळे शासनस्तरावर प्रस्ताव पान 3 वर

# अंबाजोगाई येथे 25 ते 31 ऑक्टोबर 2025 दरम्यान 'श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञा'चे आयोजन; आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते सभामंडपाचे भूमिपूजन संपन्न




प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी

दिव्य ज्योती जागृती संस्थान (डीजेजेएस), शाखा लातूर यांच्या वतीने अंबाजोगाई येथे आगामी 25 ते 31 ऑक्टोबर 2025 या कालावधीत भव्य श्रीमद् देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंड, अंबाजोगाई येथे हा धार्मिक सोहळा संपन्न होणार असून, साध्वी सुश्री अदिती भारतीजी महापुराणाचे सुमधुर निरूपण करणार आहेत.

या ज्ञानयज्ञाच्या तयारीसाठी योगेश्वरी महाविद्यालय ग्राउंडवर उभारण्यात येणाऱ्या सभामंडपाचे भूमिपूजन आज, आमदार नमिता मुंदडा यांच्या समवेत आदरणीय नंदकिशोर काकाजी मुंदडा यांच्या हस्ते पार पडले.

मंगल कलश व शोभायात्रा

महापुराणाच्या ज्ञानयज्ञाचा प्रारंभ होण्यापूर्वी, 24 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11 वाजता योगेश्वरीदेवी मंदिरापासून मंगल कलश व शोभायात्रा काढण्यात पान 3 वर

# धनगर आरक्षणासाठी मादळमोहीत तरुणाचा गळफास

## एसटीत सामावून घेतले जात नसल्याची लिहिली चिठ्ठी



मादळमोही : धनगर समाजाचा एसटीमध्ये समावेश करण्यात यावा या मागणीसाठी गेल्या कित्येक वर्षांपासून अखंड समाज हा शासन दरबारी लढा लढत आहे, मात्र याकडे शासनाचे पुर्णत: दुर्लक्ष होत असल्याने धनगर समाजातील बांधवांचा आता धीर सुटताना दिसून येत आहे. आज एका 33 वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले तेव्हा त्याने त्याच्या खिशात चार ओळींची चिठ्ठी लिहून ठेवली. त्यामध्ये मी योगेश बबन चौरे धनगर समाजाला एसटीमध्ये आरक्षण मिळत नसल्यामुळे मी आत्महत्या करत आहे. असा स्पष्ट उल्लेख त्या चिठ्ठीत आहे. त्याचा पार्थीव सध्या मादळमोहीच्या रुग्णालयात असून घटनास्थळावर पोलिसांसह प्रशासनाचे अन्य अधिकारी आले आहेत. या घटनेने समाज बांधवात प्रचंड संताप व्यक्त केला पान 3 वर

# श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळम

## ➡ सलग दुसऱ्या वर्षी प्रवेशाचा 100% टप्पा पूर्ण

SHREE VAIDYANATH ITI COLLEGE HALAM



*परळी (प्रतिनिधी )- परळी तालुक्यातील ग्रामीण भागात दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान संचलित श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज चे सलग दुसऱ्या वर्षीचे प्रवेश 100%झाले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष युवा नेते माधव मुंडे सर यांनी दिली.*

याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी तालुक्यातील हाळम या गावी विद्यार्थ्यांना रोजगारक्षम अभ्यासक्रम उपलब्ध करून देणारे श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज सन 2023 पासून कार्यरत आहे या कॉलेजमध्ये इलेक्ट्रिशियन, वायरमन, सोलार टेक्निशियन, व हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर हे अभ्यासक्रम अभ्यासले जातात यावर्षी मी प्रवेशाचा शंभर टक्के कोटा पूर्ण झालेला आहे. गेल्या वर्षीपासून विध्यार्थ्यांना रोजगार क्षम बनवणाऱ्या अभ्यासक्रमाची पालक वर्गातून अभ्यासक्रमाची मागणी होत असताना आधुनिक युगात होत असलेल्या या जीवघेण्या स्पर्धेत टिकण्यासाठी नवीन अभ्यासक्रमाचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे.तर या स्पर्धेत विध्यार्थी टिकणार आहे.अशा स्पर्धेत टिकणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश या संस्थेत आहे हाळम सारख्या ग्रामीण भागात श्री वैद्यनाथ पान 3 वर

# नांदेड-हडपसर-नांदेड विशेष गाडीच्या 04 फेऱ्या



परळी प्रतिनिधी

दिवाळी निमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वे ने नांदेड-हडपसर-नांदेड विशेष गाडी लातूर मार्गे चालविण्याचे ठरविले आहे. ते पुढील प्रमाणे --

1. नांदेड- हडपसर विशेष गाडीच्या 02 फेऱ्या :

गाडी क्रमांक 07607 हुजूर साहिब नांदेड ते हडपसर विशेष गाडी दिनांक 21 ऑक्टोबर, 2025 आणि 28 ऑक्टोबर 2025 मंगळवारी नांदेड रेल्वे स्थानकावरुन सकाळी 08.30 वाजता सुटेल आणि पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी शहर, कुर्डूवाडी, दौंड, मार्गे हडपसर येथे रात्री 21.40 वाजता पोहोचेल.

2. हडपसर - नांदेड विशेष गाडीच्या 02 फेऱ्या :

गाडी क्रमांक 07608 पान 3 वर

# पांगरी रोडवर तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



बीड (: पांगरी रोडवर एका वस्तीवर राहणाऱ्या 35 वर्षीय तरुणाने आज पहाटेच्या दरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केली. सदरील तरुणाच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. मृतदेहाचे जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.

चंद्रकांत बंडु दिंडे (वय 35 वर्षे, रा.पांगरी रोड) या तरुणाने आज पहाटे चार वाजण्याच्या पान 3 वर

# अतिवृष्टी, पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

## बीड जिल्ह्यासाठी 102 कोटी 63 लाख; तहसीलदार व कर्मचारी रात्री जागून याद्या अपलोड



बीड : सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेतला असून राज्यातील पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्ह्यांसाठी तब्बल 1346 कोटी 30 लाख रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीपैकी बीड जिल्ह्यासाठी 102 कोटी 63 लाख रुपये वितरित होणार आहेत. शासन निर्णय 16 ऑक्टोबर 2025 नुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे अतिवृष्टी आणि पूरामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना 'इनपुट सबसिडी' या स्वरुपात आर्थिक मदत दिली जाणार असून ही मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे बीड तालुक्यातील नुकसान व मदतवाटपाची तयारी बीड तालुक्यात एकूण 1,20,872 हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान नोंदवले गेले आहे. पान 3 वर

# बीडचा नगराध्यक्ष भाजपचाच होणार : देशमुख, मुंदडा, लोढा



बीड, : बीडचा नगराध्यक्ष हा भारतीय जनता पार्टीचाच होणार, असा ठाम विश्वास पक्ष निरीक्षक अक्षय मुंदडा यांनी व्यक्त केला. बीड नगरपरिषद निवडणूक 2025 संदर्भात इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीसाठी बीड येथील हॉटेल अन्विता येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीचे आयोजन शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले होते. बैठकीला वैद्यनाथ बँकेचे उपाध्यक्ष रमेश कराड, भाजप राज्य परिषदेचे सदस्य अरुण राऊत, माजलगाव मंडलाध्यक्षा रूपाली कचरे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, शिवाजी मुंडे, अजय सवाई, गणेश लांडे, शांतीनाथ डोरले, अनिल चांदणे, पालसिंगणकर, उपस्थित होते. मुंदडा म्हणाले, स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांनी ज्या तळागाळापर्यंत पक्षाची पान 3 वर

# आ. नमिताताई मुंदडा यांची स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाईच्या अभ्यागत मंडळ सदस्यपदी निवड!

## » सर्व स्तरांतून निर्णयाचे स्वागत; वैद्यकीय क्षेत्रातील विकासाला मिळणार गती




प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार सौ. नमिताताई अक्षय मुंदडा यांची स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथील महत्त्वपूर्ण 'अभ्यागत मंडळ (Visitor's Board)' सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने ही निवड नुकतीच जाहीर केली असून, या निवडीबद्दल सर्व स्तरांतून हार्दिक अभिनंदन व स्वागत केले जात आहे.

स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालय हे मराठवाड्याच्या ग्रामीण भागासाठी आरोग्य सेवेचे एक प्रमुख केंद्र आहे. या संस्थेच्या कामकाजात अधिक सुधारणा, विकास योजनांचा प्रभावी पाठपुरावा आणि परिसरातील नागरिकांचे आरोग्य प्रश्न थेट प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी अभ्यागत मंडळ महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

पान 3 वर

# तरुणाचा छातीत गोळी लागलेला मृतदेह आढळल्याने खळबळ; बाजूला पिस्तूल पडून



कडा ( बीड) : आष्टी तालुक्यातील अंभोरा-हिवरा रस्त्यावर एका तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. या तरुणाच्या छातीत गोळी झाडल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसत आहे, तर मृतदेहाजवळच एक दुचाकी आणि विनापरवाना पिस्तूल आढळून आले आहे. ही खळबळजनक घटना शनिवारी अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत समोर आली.

आष्टी तालुक्यातील वाघळुज येथील मयूर उर्फ बाळा रामदास चव्हाण (वय 35) याचा मृतदेह अंभोरा-हिवरा रस्त्यावरील कच्च्या रस्त्यालगत सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना दिसला. नागरिकांनी तात्काळ पोलिसांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. रस्त्याच्या कडेला लावलेली एक दुचाकी, छातीत गोळी लागल्याची जखम आणि मृतदेहाजवळ पडलेले पिस्तूल पोलिसांना आढळून आले. मयूर चव्हाण हा मिस्त्री काम करत होता. त्याच्याजवळ हे पान 3 वर

# गौरवाडी रस्ता प्रकरणी 'आझाद क्रांती सेने'ची आक्रमक भूमिका; तहसीलदारांना निवेदन, दखल न घेतल्यास 28 ऑक्टोबरला आमरण उपोषणाचा इशारा



प्रकाश मुंडे/केज प्रतिनिधी

केज तालुक्यातील गौरवाडी येथील शेतकरी रामा लक्ष्मण दुनघव यांनी आपल्या वडिलोपार्जित वहिवाटीचा रस्ता मोकळा करण्यासंदर्भात 'आझाद क्रांती सेने'च्या माध्यमातून केज तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाने या निवेदनाची दखल न घेतल्यास, 28/10/2025 रोजी तहसील कार्यालयासमोर पाळीव प्राण्यांसह आमरण उपोषण करण्याचा इशारा दुनघव कुटुंबाने दिला आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

गौरवाडी येथील शेतकरी व ऊसतोड कामगार असलेले रामा लक्ष्मण दुनघव यांचे वडील लक्ष्मण वडजू दुनघव यांनी गौरवाडीतील सर्वे नंबर 112/2 मध्ये जमीन विकत घेऊन तिथे वास्तव्य सुरु केले होते. कालांतराने या भागात सुमारे 200 लोकांची वस्ती तयार झाली. वीज, पाणी, रस्ता आणि पायवाट यांसारख्या आवश्यक सुविधाही तयार झाल्या, ज्या वडिलोपार्जित असल्याचे दुनघव कुटुंबीय सांगतात.

मात्र, मध्यंतरी राजकीय द्वेषापोटी काही लोकांनी हा वहिवाटीचा रस्ता अडवला. इतकेच नाही तर, दुनघव कुटुंबीयांनी टाकलेली पाण्याची पाईप लाईन जेसीबीच्या माध्यमातून खोदण्यात आली, ज्यामुळे दळणवळणासह पाणीपुरवठ्यातही अडथळा निर्माण झाला. मूळ रस्त्याच्या जागी मोठी नाली करून तिथे झाडे लावल्याचे निवेदनात नमूद आहे.

या लोकांवर आरोप:

विलास दादाराव घाडगे, कल्यान दादाराव घाडगे, दिपक विलास घाडगे, भाउसाहेब पान 3 वर

# माजलगाव मतदार संघातील श्री माधवजी निर्मळ यांच्या सह अनेक नेते कार्यकर्ते करणार भाजपा मध्ये प्रवेश

## राष्ट्रवादीला पडणार मोठे खिंडार





धारूर ( बाबुराव तिडके ) माजलगाव विधानसभा लढलेले श्री माधव ( तात्या ) निर्मळ यांनी चांगल्या प्रकारे मतदान घेतले त्यांचे काम देखिल चांगले आहे मोठा जनाधार त्यांच्या पाठीमागे आहे हे मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या लक्षात येताच ताईनी माधव ( तात्या ) निर्मळ यांना भाजपा मध्ये येण्याचे सुतोवात केले ताई या आठवडयात त्यांना पक्ष प्रवेशाची तारीख देण्याची शक्यता आहे माजलगाव मतदार संघातील अनेक सरपंच चेअरमण मार्केट कमेटीचे संचालक मा पंचायत समिती सदस्य / मा जि प सदस्यांसह नेते कार्यकर्ते श्री माधवजी निर्मळ यांच्या सह भाजपा मध्ये प्रवेश करणार असल्याचे निश्चीत झालेले आहे तशी तयारी देखिल अंतिम टप्प्यात आलेली दिसुन येत आहे त्यामुळे याचा जबरदस्त फटका माजलगाव मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला बसणार असल्याचे बोलले जाते कारण या भागाचे आमदार यांचा एक हुकमी कारभार आपला तुपला ओळखने जवळच्या माणसालाच गुत्तेदारी देणे निष्ठावंताना बाजुला सारने सामान्य माणसाला किंमत न देणे या कारणामुळे विद्यमान आमदार यांच्या विषयी खुपच रोष आहे त्यामुळे शेवटी वैतागुन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते कार्यकर्ते यांनी भाजपाचा रस्ताच बरा म्हणुन भाजपा मध्ये डेरेदाखल होण्याचा मार्ग स्विकारला पान 3 वर



● वडवणी – पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वर्षाताई व्हगाडे मॅडम यांना वाढदिवसानिमित्त प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देताना पत्रकार सतीश मजमुले व विलास गवळी दिसत आहेत.